www.sgbauonline.com

AU–1966

**B.A. (Part—II) Examination**

**(Optional Subject)**

**RASHTRASANT TUKDOJI THOUGHT**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

सूचना:— (1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(3) प्रश्न क्रं 4 चे सर्व बहुपर्यायी उपप्रश्न सोडविणे आवश्यक आहे

1. (अ) थोडक्यात उत्तरे लिहा :–

(1) राष्ट्रसंत तुकडोजींचे विश्वधर्म परिषदेतील विचार स्पष्ट करा. 5

(2) राष्ट्रसंत तुकडोजींनी विशद केलेल्या 'व्यक्तिधर्माचे' स्वरूप स्पष्ट करा. 5

(3) 'विश्वशांतियोग' या ग्रंथाच्या आधारे सामुदायिक प्रार्थनाचे महत्त्व स्पष्ट करा. 5

(4) 'दिव्य दर्शन' भजनावलीतील 'मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी' ही रचना श्रम आणि सेवा या मूल्यांचा गौरव करणारी आहे. स्पष्ट करा. 5

**किंवा**

(ब) (1) राष्ट्रसंत तुकडोजींच्या 'लोकशाहीचे पोवाडे' या मराठी पद्य ग्रंथाच्या आधारे राष्ट्रसंतांचा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार स्पष्ट करा. 5

(2) राष्ट्रसंत तुकडोजींनी विशद केलेल्या 'संघटना धर्माचे' स्वरूप स्पष्ट करा. 5

(3) 'नवजागृती' भजनावलीतील 'माणुस द्या मज माणुस द्या' या भजनातून कोणता नव विचार राष्ट्रसंतांनी रुजविला आहे ? 5

(4) राष्ट्रसंत तुकडोजींनी युवकांकडून कोणत्या अपेक्षा व्यक्त केल्या हे त्यांच्या मराठी भजनांच्या आधारे स्पष्ट करा. 5

2. (अ) थोडक्यात उत्तरे लिहा :–

(1) 'मेरी जापान यात्रा' या प्रवास वर्णनाच्या आधारे राष्ट्रसंताच्या विश्वधर्माचे स्वरूप स्पष्ट करा. 5

(2) 'भारत साधु समाज की सेवासाधना' या ग्रंथात भारतातील साधूंनी समाजोन्नतीसाठी कोणकोणती सेवा द्यावी असे राष्ट्रसंत तुकडोजी सुचवितात ? 5

(3) राष्ट्रसंत तुकडोजींच्या हिन्दी ग्रंथातून अधोरेखित झालेल्या व्यक्तिधर्माचे स्वरूप स्पष्ट करा. 5

(4) 'राष्ट्रीय भजनावली' तील 'आते हैं नाथ हमारे' या राष्ट्रसंत तुकडोजींच्या भजनाने 42 च्या क्रांतीचा इतिहास घडविला स्पष्ट करा. 5

**किंवा**



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(क) (1) धर्म व राष्ट्र यांच्या नवनिर्माणाकरिता राष्ट्रसंत तुकडोजींनी 'राष्ट्रनौका' या भजनसंग्रहातून कोणती कृतिरेषा समाजाला दिली आहे ? 5

(2) 'क्रांतीदीप' भजनावलीतील 'वेदशास्त्र तुम पढे हो पर–यह जनभाषा नहिं जानोगे' या भजनातून जनभाषेचा गौरव राष्ट्रसंत तुकडोजींनी कोणत्या भूमिकेतून केला ? 5

(3) 'समाज की भूल' या हिंदी गद्य ग्रंथाच्या आधारे राष्ट्रसंत तुकडोजींची अंधश्रद्धा व बुवाबाजी विषयक भूमिका स्पष्ट करा. 5

(4) राष्ट्रसंत तुकडोजींच्या हिंदी भजनांमधून त्यांच्या सेवाभावी समाजधर्माचे स्वरूप स्पष्ट करा. 5

3. राष्ट्रसंत तुकडोजींनी 'राष्ट्रसंतांची प्रवचने' या संग्रहात विवेचिलेला व्यक्तिधर्म ते राष्ट्रधर्म हा धर्मसोपान स्पष्ट करा. 20

किंवा

राष्ट्रसंत तुकडोजींनी 'राष्ट्रसंतांची पत्रे' या संग्रहातील पत्रोत्तरातून प्रश्नकर्त्या पत्रलेखकाचे समाधान कसे आत्मीयतापूर्वक केले आहे ते स्पष्ट करा.

4. योग्य पर्याय निवडा :– 20

(1) राष्ट्रसंत तुकडोजींना 'राष्ट्रसंत' हे नामाभिधान ______ यांनी दिले.

(अ) कर्मयोगी संत गाडगे बाबा (ब) महात्मा गांधी

(क) पंडित जवाहर लाल नेहरू (ड) डॉ. राजेन्द्र प्रसाद

(2) राष्ट्रसंत तुकडोजींचा सर्वाधिक प्रसिद्ध ग्रंथ ______ हा होय.

(अ) ग्रामगीता (ब) गीताप्रसाद

(क) राष्ट्रसंतांची भजने (ड) क्रांतिवीणा

(3) राष्ट्रसंत तुकडोजींनी सुरू केलेल्या मासिकाचे नाव ______ आहे.

(अ) जीवन विकास (ब) सुराज्य साधना

(क) श्रीगुरुदेव (ड) किशोर

(4) राष्ट्रसंत तुकडोजींचे जन्म नाव ______ आहे.

(अ) माणिक (ब) देवबाबा

(क) राष्ट्रसंत (ड) तुकड्या

(5) 'लोकशाहीचे पोवाडे' हा पद्य ग्रंथ ______ यांनी लिहिला.

(अ) संत तुकाराम (ब) संत तुकडोजी

(क) महात्मा फुले (ड) संत रामदास



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(6) येता तरी सुखे या। जाता तरी सुखे जा।
______ । या झोपडीत माझ्या।।
(अ) कोणावरी न बोजा (ब) दाराला नाही दोऱ्या
(क) शांती सदा विराजे (ड) सुख सदा विराजे

(7) राष्ट्रसंत तुकडोजींनी 'आदेशरचना' मधून सर्वमान्य उपास्यदैवत म्हणून ______ प्रतिष्ठापित केले.
(अ) महादेवाला (ब) अल्लाला
(क) श्रीगुरुदेवाला (ड) श्रीरामाला

(8) 'निर्भय हो यह देश की ______ मंगल कीर्ति कराने'।
(अ) माता (ब) गाथा
(क) जनता (ड) भूमाता

(9) देशभक्तीपर भजनांसाठी राष्ट्रसंतांची ______ ही भजनावली प्रसिद्ध आहे.
(अ) राष्ट्रीय भजनावली (ब) नवजागृती भजनावली
(क) दिव्यदर्शन भजनावली (ड) ज्ञानकुंज भजनावली

(10) 'ग्रामगीता' हा लोकोत्तर ग्रंथ ______ यांना अर्पण केला.
(अ) माय मंजुळा (ब) महात्मा गांधी
(क) ग्रामनाथ (ड) सद्गुरु आडकोजी महाराज

5. राष्ट्रसंत तुकडोजींची स्त्री-स्वातंत्र्य जाणीव व मध्ययुगीन क्रांतीकारी संत महात्म्यांची स्त्री-स्वातंत्र्य जाणीव यांमधील साम्य-भेद त्यांच्या प्रबोधन पर साहित्याद्वारे स्पष्ट करा. 20

किंवा

राष्ट्रसंत तुकडोजींची आदर्श समाजव्यवस्था ही मध्ययुगीन क्रांतीकारी संतमहात्म्यांच्या आदर्शापेक्षा वेगळी कशी आहे हे स्पष्ट करा.



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

www.sgbauonline.com